# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

मध्यवर्ती कार्यालय, सिडकोभवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष,
बेलापूर, नवीमुंबई-४०० ६१४
दूरध्वनी : ०२२ -२७५७१६७३,, २७५७१०६६, २७५७१६७७ व २७५७८४०९
फॅक्स : ०२२-२७५७०९६९ व २७५७१६६६

जा.क्र.मजीप्रा-२०१५/सभा-१३४/(३७) /आ.४ /१७४४ दि.२६/११/२०१५

प्रति,
मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्रामविकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव, (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

विषय :- दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासु,

(उदय जाधव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : १३४ व्या बैठकीचे इतिवृत्त.
(पृ.क्र. १ ते १४ )

लिपिक
नगरविकास विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

Clerk
Office of the Minister of State for Home (Urban), Urban Development General Administration, Law and Judiciary Deptt., Parliamentary Affairs
Government of Maharashtra
Mantralaya, Mumbai 400 032

P. A. to Secretary
Water Supply and Sanitation Department
Mantralaya, Mumbai 400 032

लिपिक
प्र.स. (ग्रामविकास) यांचे कार्यालय
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय, मुंबई - 400 032.

लिपिक
मंत्री, ग्रामविकास व जलसंधारण
महिला व बालविकास यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन, मंत्रालय

लिपिक
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

प्रधान सचिव (ऊर्जा)

**प्रत माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (तांत्रिक), म.जी.प्रा., मुंबई.
संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडकोभवन, नवीमुंबई.
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., सिडकोभवन, नवीमुंबई.
अधीक्षक अभियंता, मित्रा, नाशिक
उपमुख्य लेखाधिकारी (१/२) म.जी.प्रा., सिडकोभवन, नवीमुंबई.
आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, नवीमुंबई.
कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., सिडकोभवन, नवीमुंबई.
प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, नवीमुंबई.
सर्व कक्ष अधिकारी/कार्यासन अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई/सिडकोभवन, नवीमुंबई
(आस्थापना:                )
सर्व लेखा अधिकारी, म.जी.प्रा., सिडकोभवन, नवीमुंबई.

1 DEC 2015
निर्गमित

| कक्ष/कार्यासन अधिकारी | | लेखा अधिकारी | | |
|---|---|---|---|---|
| आ-१/मुंबई | | अंदाजपत्रक शाखा | जगताप | रोख शाखा |
| आ-१/सि.भ. | [illegible] | गुंतवणूक/कर्ज | [illegible] | [illegible] |
| आ-२ | [illegible] | निधी शाखा | जगताप | |
| आ-३ | कांबळे | संकलन शाखा | ०१/१२/१५ | |
| आ-५ | [illegible] | लेखा परिक्षण शाखा | जगताप | |
| आ-६ | [illegible] | भ.नि.नि. शाखा | [illegible] | |
| आ-७ | खोडके | ग.वि.यो. शाखा | | |
| आ-८ | बोरसे | निवृत्तीवेतन शाखा | ०१/१२/2015 | |
| आ-९ | [illegible] | अं.ले.प. शाखा<br>वसुली शाखा | [illegible] | |

१०१

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३४ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १३४ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.ना.श्री.बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी दुपारी २.५५ वा. मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई ४०००३२, येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.ना.श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.राजेश कुमार, प्रधान सचिव, पा.पु.व स्व.विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
३) मा.श्रीमती. सुजाता सौनिक, प्रधान सचिव (१) सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४) श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई.
५) मा.श्री.यशवंत बुधवंत, अवर सचिव (प्रतिनिधी), प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.हेमंत लांडगे, संचालक (तांत्रिक) म.जी.प्रा.मुंबई तथा म.जी.प्रा. सदस्य, ठाणे.
२) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
३) श्री.एस.जी.मुखेडकर, मुख्य अभियंता (प्रभारी), म.जी.प्रा., औरंगाबाद.
४) श्री. उदय जाधव, मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई.
५) श्री.माधव जवादे, अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ, नवीन पनवेल.
६) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता, (मुख्यालय) म.जी.प्रा., मुंबई.

सर्व प्रथम मा. सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यांत आली. सभेमध्ये खालील बाबींवर चर्चा करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** म.जी.प्राच्या १३३ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

म.जी.प्राच्या संचालक मंडळाची १३३ वी सभा दि. ३ जून, २०१५ रोजी संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सविच, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा. संचालक मंडळास केली.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

CAO

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १३३ व्या सभेच्या इतिवृत्तास मा. संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३३ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेली कृतीच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि. ३ जून, २०१५ रोजी संपन्न झालेल्या १३३ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** अमृत / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान सहाय्य अभियान अंतर्गत अमरावती पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वित्तीय आकृतीबंधाप्रमाणे अमरावती महानगरपालिकेने भरावयाचा ३० टक्के हिस्सा मजीप्राने उभारणे, या बाबीस मान्यता देण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. तसेच कार्यकारी अभियंता, अमरावती यांनी प्रस्तावित योजनेबाबत सादरीकरण केले.

साधारणत: ७.५० लक्ष लोकसंख्या असलेल्या अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती म.जी.प्रा. मार्फत करण्यात येते. सध्याच्या व्यवस्थेमध्ये शहराच्या विस्तारीत भागात कोणतीही वितरण व्यवस्था नसल्यामुळे त्या भागात पाणी पुरवठ्याच्या अडचणी आहेत. त्यामुळे या अडचणींचा विचार करुन वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. त्यास अमृत अथवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान सहाय्य अभियान अंतर्गत मान्यता मिळणे अपेक्षित आहे.

अमरावती पाणी पुरवठा केंद्र हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे असून वाढीव योजनेसाठी अमरावती महानगरपालिकेने भरावयाचा हिस्सा म.जी.प्रा.ने भरणे अपेक्षीत आहे. सद्य:स्थितीतील रु.४८.४९ कोटी किंमतीच्या योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थेने भरावयाच्या हिश्याची ३० टक्के रक्कम रु.१४.५५ कोटी इतकी आहे. सदर रक्कम म.जी.प्रा. मार्फत भरण्याचे प्रस्तावित आहे व ती अस्तित्वातील तसेच संभाव्य नवीन ग्राहकांकडून लोकवर्गणी म्हणून हप्त्या हप्त्याने वसूल करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, फक्त योजनेच्या आकृतीबंधानुसार प्रत्यक्ष भरावी लागणारी रक्कमच ग्राहकांकडून मागणे योग्य राहिल, आवश्यकतेपेक्षा जास्त रक्कम वसूल करु नये असे मत संचालक मंडळाने व्यक्त केले.

सदर रक्कम प्रत्यक्ष जमा होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने म.जी.प्रा. ने सदर रक्कम सुरुवातीला स्वनिधीतून खर्च करणे आवश्यक असल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आले. सदर बाबीस संचालक मंडळाने मान्यता दिली.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

१०३

प्रस्तुत बाब संमत करण्याची विनंती मा.संचालक मंडळास करण्यात आली. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून खालील प्रमाणे प्रस्ताव प्रारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना (अमृत / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत) जि. अमरावती, अंतर्गतच्या प्रस्तावित कामामुळे पाणी पुरवठ्याच्या व्यवस्थेत सुधारणा होणार असल्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थेने भरावयाच्या हिश्याची ३० टक्के रक्कम रु.१४.५५ कोटी म.जी.प्रा. मार्फत भरण्यास व ही रक्कम घरगुती व बिगरघरगुती ग्राहकांकडून अनुक्रमे रु.१५००/- व रु.५०००/- एकरकमी अथवा रु.१२५/- व रु.४१६/- प्रती नळ जोडणी प्रमाणे पुढील २ वर्षात व समान १२ हप्त्यात वसूल करुन खर्च भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर रक्कम वसूल होईपर्यत आवश्यक रक्कम म.जी.प्रा. च्या स्वनिधीमधून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ४** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत कंत्राटदारांच्या नोंदणी नियमामध्ये सुधारणा करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबींबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडहास अवगत केले. तसेच अधीक्षक अभियंता (मु.) यांनी प्रस्तावित सुधारणाबाबत सादरीकरण केले.

सद्य:स्थितीमध्ये मजीप्रामध्ये ठेकेदार नोंदणी करणेसाठी, ठेकेदारामार्फत करण्यात आलेल्याचा सर्वच प्रकारच्या स्थापत्य अथवा विद्युत/ यांत्रिकी कामांचा अनुभव विचारात घेतला जातो.

तथापि, प्राधिकरणामार्फत पार पाडण्यात येणारी पाणी पुरवठा तसेच जलनि:सारण योजनेत समाविष्ट असलेली उद्‌भवाची कामे, जलशुध्दीकरण केंद्र, उंच/ बैठी पाण्याची टाकी, उर्ध्ववाहिनी, गुरुत्ववाहिनी, वितरण व्यवस्था इत्यादी कामे ही वैशिष्ठपूर्ण पध्दतीची आहेत. प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांची कामे पार पाडण्यात येणारी कामे विशिष्ट प्रकारची असल्यामुळे अशा प्रकारची वैशिष्ठ्यपूर्ण कामे ज्या कंत्राटदाराने पार पाडली आहेत अशाच कंत्राटदारांची नोंदणी प्राधिकरणाकडे होणे अपेक्षित आहे. या बाबीचा विचार करुन प्राधिकरणामार्फत कंत्राटदाराच्या नोंदणी नियमावलीमध्ये सुधारणा करणेसाठी कार्यक्रम बाब तयार करण्यात येऊन संचालक मंडळासमोर मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे. अस्तित्वातील नोंदणी नियमावलीमध्ये उक्त बाबींचा विचार करुन खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**अ. स्थापत्य वर्गातील नोंदणी**

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही विशिष्ट प्रकारची कामे करणारी संस्था असल्याने वर्ग I, IA, II, III, IV व IVA या स्थापत्य वर्गामध्ये नोंदणी करीता मागणी केलेल्या वर्गासाठी कंत्राटदाराने मागिल तीन वर्षामध्ये पूर्ण केलेल्या कामांच्या आवश्यक एकूण उलाढालीच्या ५०% इतक्या रक्कमेचे काम हे पाणी पुरवठा योजना किंवा मलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेली कामे कंत्राटदाराने पार पाडलेली असली पाहिजेत.

**अथवा**

वर्ग I, IA, II, III, IV व IVA या स्थापत्य वर्गामध्ये नोंदणी करीता मागणी केलेल्या वर्गाच्या दोन टप्पे खाली असलेल्या वर्गाच्या, कमाल किंमतीचे कमीत कमी एक काम हे पाणी पुरवठा योजना किंवा मलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेले काम कंत्राटदाराने पार पाडलेले असले पाहिजे. (उदा. जर वर्ग-१ मध्ये नोंदणी मिळण्यासाठी अर्ज केला असेल तर वर्ग-२ म्हणजेच रु.७५० लक्ष किंमतीचे काम आणि त्याप्रमाणे पुढील वर्गाकरीता)

२. वर्ग V, VI व VII च्या कंत्राटदार नोंदणी करीता व पाणी पुरवठा व जलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेली कामे कंत्राटदाराने पार पाडलेली नसली तरी इतर कामे गृहीत धरुन नोंदणी देण्याची कार्यवाही करणेत येईल.

ब. विद्युत व यांत्रिकी वर्गातील नोंदणी

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही विशिष्ट प्रकारची कामे करणारी संस्था असल्याने वर्ग अ, ब व क या विद्युत व यांत्रिकी वर्गामध्ये नोंदणी करीता मागणी केलेल्या वर्गाकरीता कंत्राटदाराने मागिल तीन वर्षामध्ये पूर्ण केलेल्या कामांच्या आवश्यक एकूण उलाढालीच्या ५०% इतक्या रक्कमेचे काम हे पाणी पुरवठा योजना किंवा मलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेली कामे कंत्राटदाराने पार पाडलेली असली पाहिजेत.

**अथवा**

वर्ग अ,ब व क या विद्युत व यांत्रिकी वर्गामध्ये नोंदणी करीता मागणी केलेल्या वर्गाच्या दोन टप्पे खाली असलेल्या वर्गाच्या, कमाल किंमतीचे कमीत कमी एक काम हे पाणी पुरवठा योजना किंवा मलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेले काम कंत्राटदाराने पार पाडलेले असले पाहिजे. (उदा. जर वर्ग-अ मध्ये नोंदणी मिळण्यासाठी अर्ज केला असेल तर वर्ग-क म्हणजेच रु.२५/- लक्ष किंमतीचे काम आणि त्याप्रमाणे पुढील वर्गाकरीता)

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

२. वर्ग 'ड' व 'इ च्या कंत्राटदार नोंदणी करीता व पाणी पुरवठा व जलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेली कामे कंत्राटदाराने पार पाडलेली नसली तरी इतर कामे गृहीत धरुन नोंदणी देण्याची कार्यवाही करणेत येईल.

**क. नोंदणी फी**

तसेच प्राधिकरणामार्फत नोंदणी फी पोटी आकारण्यात येणारी रक्कम ही नोंदणी फी ही सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत आकारण्यात येणाऱ्या नोंदणी फी पेक्षा फारच कमी असल्याने स्थापत्य नोंदणी फीपोटी आकारण्यात येणारी रक्कम तसेच विद्युत व यांत्रिकी नोंदणी फी पोटी आकारण्यात येणाऱ्या रकमेमध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्याचे प्रस्तावित करण्यात आले.

| क्र. | नोंदणीचा वर्ग | आकारण्यात येणारी नोंदणी फी (रुपये) | | प्रस्तावित आकारावयाची नोंदणी फी (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | मजीप्रा | सा.बां.वि. | | |
| १ | वर्ग - १ | ३०,०००/ | ४०,०००/- | ४०,०००/- | सा.बां.वि.च्या वर्ग-१ अ शी समतुल्य |
| २ | वर्ग - १ अ | २०,०००/ | ३५,०००/- | ३५,०००/- | सा.बां.वि.च्या वर्ग-१ ब शी समतुल्य |
| ३ | वर्ग- २ | ९,०००/- | ३०,०००/- | ३०,०००/- | |
| ४ | वर्ग - ३ | ७,५००/- | २५,०००/- | २५,०००/- | |
| ५ | वर्ग- ४ | ६,०००/- | २०,०००/- | २०,०००/- | |
| ६ | वर्ग-४ अ | ५,०००/- | १५,०००/- | १५,०००/- | |
| ७ | वर्ग-५ | ४,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | |
| ८ | वर्ग-६ | २,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | |
| ९ | वर्ग-७ | १,०००/- | ३,०००/- | ३,०००/- | |

| क्र. | नोंदणीचा वर्ग | सध्या आकारण्यात येणारी नोंदणी फी (रुपये) | प्रस्तावित आकारावयाची नोंदणी फी (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | वर्ग - अ | ५,०००/- | १५,०००/- |
| २ | वर्ग - ब | ३,०००/- | १०,०००/- |
| ३ | वर्ग - क | २,०००/- | ७,५००/- |
| ४ | वर्ग - ड | १,०००/- | ५,०००/- |
| ५ | वर्ग - ई | ५००/- | १,०००/- |

उपरोक्त सुधारणांव्यतिरिक्त ठेकेदार नोंदणीबाबत इतर नियम पुर्वीप्रमाणेच राहतील.

उपरोक्त प्रस्तावित सुधारणांवर संचालक मंडळामध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावर मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी प्रस्तावित सुधारणांमुळे अपेक्षित कंत्राटदार नोंदणीसाठी

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

उपलब्ध होतील काय? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर सदस्य सचिव, मजीप्रा आणि संचालक (तांत्रिक) यांनी आवश्यक कंत्राटदार नोंदणीसाठी उपलब्ध होतील असे नमूद केले. या बाबीचा विचार करुन प्राधिकरणामार्फत कंत्राटदाराच्या नोंदणी नियमावलीमध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणांच्या प्रस्तावास संचालक मंडळातर्फे मान्यता देण्यात आली. तसेच या प्रकरणीची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाच्या सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**ठराव :** असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत कंत्राटदार नोंदणी नियमावलीमध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणांना मान्यता देण्यात येत असून, त्या अनुषंगाने अस्तित्वातील नोंदणी नियमामध्ये बदल करुन कार्यवाही करण्यास/ सूचना निर्गमित करण्यास प्राधिकरणाच्या सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्यरित्या गुंतवावी याबाबत शासनाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार मजीप्राकडूनही अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणुका केल्या जातात, असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

अल्प मुदतीच्या गुंतवणुकीचा प्रस्ताव सर्वसाधारणपणे १५ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी कालावधीतील वेगवेगळ्या टप्यांसाठी प्रस्तावित केले जातात. या करिता वेगवेगळ्या राष्ट्रीयकृत बॅकांचे / वित्तीय संस्थांचे व्याजदर मागविले जातात. त्यापैकी ज्या बँकाचे व्याजदर सर्वाधिक असतील अशा बँकेकडे मा.सदस्य सचिव व संचालक (वित्त) यांच्या मान्यतेने गुंतवणूक केली जाते.

तसेच मुदतीच्या गुंतवणुकीमध्ये (१ वर्षापेक्षा जास्त) घसारा निधी, सिंकींग फंड, पेन्शन फंड व डेसिगेटेड अकाऊन्ट इ. गुंतवणुकीचा समावेश होतो. शासनाच्या वित्त विभागाच्या निर्देशानुसार दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकी फक्त राष्ट्रीयकृत बँकेत करावयाच्या आहेत, म्हणून ही गुंतवणुक करताना राष्ट्रीयकृत बँकेकडून व्याजदर मागविले जातात. ज्या बँकानी सर्वाधिक व्याजदर दिले आहेत अशा बँकेकडे सदस्य सचिवांच्या मान्यतेने गुंतवणूक केली जाते.

प्राधिकरणाच्या १३३ व्या बैठकीत दिनांक ३.३.२०१५ ते २६.५.२०१५ या कालावधीचे अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यास मान्यता मिळाली आहे. आता दिनांक २७.५.२०१५ ते दि.६.१०.२०१५ या कालावधीत केलेल्या अल्प मुदतीसाठी केलेली गुंतवणुकीस मा. संचालक मंडळाची मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

२. वर्ग 'ड' व 'इ च्या कंत्राटदार नोंदणी करीता व पाणी पुरवठा व जलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेली कामे कंत्राटदाराने पार पाडलेली नसली तरी इतर कामे गृहीत धरुन नोंदणी देण्याची कार्यवाही करणेत येईल.

**क. नोंदणी फी**

तसेच प्राधिकरणामार्फत नोंदणी फी पोटी आकारण्यात येणारी रक्कम ही नोंदणी फी ही सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत आकारण्यात येणाऱ्या नोंदणी फी पेक्षा फारच कमी असल्याने स्थापत्य नोंदणी फीपोटी आकारण्यात येणारी रक्कम तसेच विद्युत व यांत्रिकी नोंदणी फी पोटी आकारण्यात येणाऱ्या रकमेमध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्याचे प्रस्तावित करण्यात आले.

| क्र. | नोंदणीचा वर्ग | आकारण्यात येणारी नोंदणी फी (रुपये) | | प्रस्तावित आकारावयाची नोंदणी फी (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | मजीप्रा | सा.बां.वि. | | |
| १ | वर्ग - १ | ३०,०००/ | ४०,०००/- | ४०,०००/- | सा.बां.वि.च्या वर्ग-१ अ शी समतुल्य |
| २ | वर्ग - १ अ | २०,०००/ | ३५,०००/- | ३५,०००/- | सा.बां.वि.च्या वर्ग-१ ब शी समतुल्य |
| ३ | वर्ग- २ | ९,०००/- | ३०,०००/- | ३०,०००/- | |
| ४ | वर्ग - ३ | ७,५००/- | २५,०००/- | २५,०००/- | |
| ५ | वर्ग- ४ | ६,०००/- | २०,०००/- | २०,०००/- | |
| ६ | वर्ग-४ अ | ५,०००/- | १५,०००/- | १५,०००/- | |
| ७ | वर्ग-५ | ४,०००/- | १०,०००/- | १०,०००/- | |
| ८ | वर्ग-६ | २,०००/- | ५,०००/- | ५,०००/- | |
| ९ | वर्ग-७ | १,०००/- | ३,०००/- | ३,०००/- | |

| क्र. | नोंदणीचा वर्ग | सध्या आकारण्यात येणारी नोंदणी फी (रुपये) | प्रस्तावित आकारावयाची नोंदणी फी (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | वर्ग - अ | ५,०००/- | १५,०००/- |
| २ | वर्ग - ब | ३,०००/- | १०,०००/- |
| ३ | वर्ग - क | २,०००/- | ७,५००/- |
| ४ | वर्ग - ड | १,०००/- | ५,०००/- |
| ५ | वर्ग - ई | ५००/- | १,०००/- |

उपरोक्त सुधारणांव्यतिरिक्त ठेकेदार नोंदणीबाबत इतर नियम पुर्वीप्रमाणेच राहतील.

उपरोक्त प्रस्तावित सुधारणांवर संचालक मंडळामध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावर मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी प्रस्तावित सुधारणांमुळे अपेक्षित कंत्राटदार नोंदणीसाठी

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यांत येतो की, दि.२७.५.२०१५ ते दि.६.१०.२०१५ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६.** ई-निविदा कार्य प्रणालीनुसार अंमलबजावणी करावयाच्या कामांच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

शासन निर्णय क्र.जाहिरात-२००९/प्र.क्र.१३७/का-३४, दि. ३१.८.२००९ अन्वये निविदाच्या जाहिराती वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्याविषयी सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. तथापी, या प्रमाणे निविदा सूचना प्रसिध्दीबाबत क्षेत्रीय कार्यालयामार्फत कार्यवाही करताना अनेक वेळा कमी खप/ महत्त्व/ प्रसिध्दी असलेल्या वर्तमान पत्रामध्ये निविदा सूचनांची जाहिरात प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे सदर निविदेची प्रसिध्दी योग्य प्रकारे झाली नसल्याचे निदर्शनास आले.

यामुळे वरील बाब विचारात घेऊन, योजनेच्या निविदेची पुरेशी प्रसिध्दी होण्याच्या दृष्टीने निविदांच्या जाहिराती वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्याच्या संदर्भात मजीप्राचे परिपत्रक क्र.१६६ दि.२.९.२०१५ नुसार, सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकातील तपशीलाबाबत सर्व उपस्थितांना अवगत करण्यात आले. परिपत्रकातील तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१. कन्सल्टन्सी संबंधीची सर्व जाहिराती राष्ट्रीय स्तरावरील दैनिकामध्ये प्रसिध्दीस देण्यात याव्यात.
२. योजनांच्या जाहिराती प्रसिध्द करण्याविषयी खालील निकषाचे अनुपालन करण्यात यावे.

| अ. क्र. | निविदेतील कामाच्या अंदाजीत किमतीची मर्यादा | राष्ट्रीय स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र | राज्य स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र | जिल्हा स्तरावरील दैनिक वर्तमान पत्र |
|---|---|---|---|---|
| १. | रु.१० लक्ष पर्यंत | निरंक | १ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र. | १ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र. |

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | रु.१० लक्षाच्या वर ते रु.१० कोटीपर्यंत. | निरंक | अ) १ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र.<br>ब) १ सर्वात जास्त खपाचे इंग्रजी वर्तमान पत्र. (राज्यस्तरीय आवृती) | १ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र. |
| ३. | रु.१० कोटी पेक्षा जास्त व रु.५० कोटीच्या आत. | १ सर्वात जास्त खपाचे इंग्रजी वर्तमान पत्र. (राष्ट्रीय आवृत्ती) | २ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र. | निरंक |
| ४. | रु.५० कोटी पेक्षा जास्त. | २ सर्वात जास्त खपाचे इंग्रजी वर्तमान पत्र. (राष्ट्रीय आवृत्ती) | २ सर्वात जास्त खपाचे मराठी वर्तमान पत्र. (राज्यस्तरीय आवृती). | निरंक |

**टिपः** मराठी/इंग्रजी दैनिक वर्तमानपत्र त्या त्या स्तरावरील (देश/राज्य/जिल्हा) जास्त खपाची असावीत.

३. प्रारुप निविदा प्रपत्रे मंजूर करणारे अधिकारी यांनी निविदा प्रसिध्दीच्या जाहिरातीचा मसूदा मंजूर करावा. तद्नंतरच निविदा प्रसिध्दीबाबत कार्यवाही करावी.

४. जाहिराती प्रसिध्द होण्याच्या २४ तास आधी निविदा संच तयार असेल याची दक्षता घ्यावी.

५. निविदा सूचना प्रसिध्दीबाबतचा नमुना सर्वसाधारणतः ९.५ x ६.० चौ.सें.मी. एवढा असावा. जाहिरात ही संक्षिप्त असावी. त्यामध्ये कामाचे नाव/ठिकाण/किंमत तसेच कार्यालयाचे नाव इ. बाबी नमूद कराव्यात. सविस्तर निविदेसाठी इ-टेंडर वेबसाईट पहाणेबाबत सुचनेचा समावेश करावा. वेबसाईटवर सविस्तर माहिती दिलेली असल्याने विनाकारण इतर माहिती जाहिरातीमध्ये देण्याची गरज नाही. कारण त्यामुळे जाहिरातीचा आकार वाढून त्याचे शुल्कही मोठ्या प्रमाणात वाढते.

६. मराठी वर्तमान पत्रातील जाहिरात मराठीमध्ये तर इंग्रजी वर्तमान पत्राची जाहिरात इंग्रजीमध्ये असावी.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

१०९

त्याचप्रमाणे परिपत्रक क्र.१६६ सोबत निविदा सूचनेचा नमुनाही सर्व क्षेत्रिय कार्यालयांना पाठविण्यात आला आहे.

वरीलप्रमाणे योजनांच्या निविदेची जाहिरात प्रसिध्द करण्याच्या संदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांना मान्यता प्रदान करण्याविषयी संचालक मंडळास विनंती करण्यात आली. प्रस्तावावर साधक बाधक चर्चा होऊन जास्त खपाच्या एका दैनिकाऐवजी, सर्वात जास्त खपाच्या प्रथम तीन दैनिंकामध्ये क्रमाक्रमाने रोस्टर पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणे योग्य राहील, असे ठरले. या बाबतीत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

परिपत्रक क्र.१६६ दि.२.९.२०१५ अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रकाबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली असून, निविदांची जाहिरात प्रसिध्द करण्याविषयी परिपत्रकास संचालक मंडळाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, सर्वात जास्त खपाच्या एका दैनिकाऐवजी सर्वाधिक खपाच्या प्रथम ३ दैनिकांमध्ये क्रमाक्रमाने जाहिरात प्रसिध्द करावी. त्याप्रमाणे परिपत्रकामध्ये सुधारणा करण्यात यावी. याबाबतची पुढील कारवाई करण्यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७** वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना, ता. पनवेल, जि. रायगड.

या बाबी संदर्भात सदस्य सचिव व मुख्य अभियंता, ठाणे यांनी सादरीकरण केले. सिडको, न्हावा शेवा, जेएनपीटी व मार्गस्थ गावे यांच्यासाठी साधारणत: १०० द.ल.लि. क्षमतेची एक योजना म.जी.प्रा. मार्फत सन १९९० च्या दरम्यान पूर्ण करण्यात आली आहे. कच्चे तसेच शुध्द पाणी वाहून नेण्यासाठी मुख्यत्वे मृदू लोखंडाच्या जलवाहिन्यांचा वापर करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत योजनेची क्षमता कमी पडत असून जलवाहिन्या सुध्दा खारट हवामानामुळे गंजलेल्या आहेत. त्यामुळे बिगर महसूली पाण्याचे प्रमाण वाढले असून दैनंदिन परिचालनामध्ये म.जी.प्रा.स तोटा सहन करावा लागत आहे. तसेच ग्राहकांना अपुरा पाणी पुरवठा होत आहे. ग्राहकांकडून सध्याच्या मागणीव्यतिरिक्त वाढीव पाण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे योजनेची क्षमता वाढविणे गरजेचे झाले आहे.

सदर योजनेच्या क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने वाढीव योजना राबविण्याचे प्रस्तावित असून योजनेचा खर्च संभाव्य ग्राहकांकडून भांडवली अंशदानाच्या स्वरुपात उपलब्ध होणार आहे. या बाबत मुख्य अभियंता यांनी मागणी व खर्चाचा सहभाग याबाबतचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात आला.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | पाण्याची मागणी (द.ल.लि. प्रतिदिन) | खर्चाचा सहभाग (रु.कोटी) |
|---|---|---|---|
| १. | सिडको | ११५ | १४४.९३ |
| २. | जे.एन.पी.टी. | ४० | ४३.६२ |
| ३. | पनवेल नगर पालिका | २० | २६.१५ |
| | **एकूण** | **१७५** | **२१४.७०** |

वरील ग्राहकांव्यतिरिक्त एमएमआरडीएने त्यांच्या काही वसाहतींसाठी पाण्याची मागणी केली असून या मागणीचा उपरोक्त प्रस्तावात समावेश नाही. त्यांची मागणी पुरविण्याकरिता पाणी आरक्षण उपलब्ध नसल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आले. तथापि, योजनेचे काम सुरु झाल्यानंतर वाढीव मागणी विचारात घेणे शक्य होणार नसल्याने एमएमआरडीए ची मागणी प्राथम्याने अंतिम करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

या व्यतिरिक्त फक्त जे.एन.पी.टी. या संस्थेसाठी पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी बदलण्याच्या सुमारे रु.४५.०० कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देऊन जे.एन.पी.टी. यांच्याशी आवश्यक करारनामा करुन पूर्ण ठेव तत्वावर कामे करण्यासाठी निधी प्राप्त करुन घेण्याचे प्रस्तावित आहे. या प्रस्तावासही मान्यता देण्याची संचालक मंडळास विनंती करण्यात आली.

सद्य:स्थितीत रु.२१४.७० कोटी किंमतीच्या योजनेस तांत्रिक मान्यता देण्यात आल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आले. योजनेतून ठोक पाणी पुरवठा घेणारे ग्राहक भांडवली खर्चासाठी निधी उपलब्ध करणार असल्याने या योजनेस संचालक मंडळाची मान्यता देण्याची विनंती करण्यात आली. तसेच निविदा प्रक्रियेच्या काळात एमएमआरडीएस वाढीव पाणी आरक्षण प्राप्त झाल्यास सदर वाढीव पाणी आरक्षणानुसार व एमएमआरडीएच्या मागणीच्या अनुषंगाने सदर योजनेचे पुनर्संकल्पन करणे व योजनेच्या नवीन किंमतीनुसार सर्व ग्राहकांचा भांडवली खर्चाचा हिस्सा अंतिम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी जास्तीत जास्त ३० महिन्यांपर्यंत मर्यादित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

सध्याच्या अस्तित्वातील न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेमधून सहभागी ग्राहकांची वाढीव मागणी भागविणे शक्य नसल्याने, तसेच अस्तित्वातील मृदू पोलादी जलवाहिन्या या कालबाह्य

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

१११/

झालेल्या असल्याने सहभागी ग्राहकांच्या आर्थिक सहभागातून प्रस्तावित योजना, **मजीप्राची योजना म्हणून राबविण्यास** पुढील शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. निविदा प्रक्रियेच्या काळात एमएमआरडीएची पाण्याची मागणी असल्यास व भांडवली अंशदान देण्याची तसेच वाढीव पाणी आरक्षण मिळण्याबाबत प्रयत्न करण्याची एम.एम.आर.डी.ए. ची तयारी असल्यास त्यांची मागणी विचारात घेऊन योजनेची पुनर्रचना करणेत यावी.

२. सहभागी संस्थांव्दारे, आवश्यक मागणीची व अंशदानापोटी आवश्यक रक्कम भरण्याची बाब अंतिम करुन रक्कम प्राप्त करून घ्यावी.

३. संबंधित संस्थांबरोबर आवश्यक करारनामा करण्यात यावा.

४. जे.एन.पी.टी. या संस्थेसाठी पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी बदलण्याच्या सुमारे रु.४५.०० कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देऊन जे.एन.पी.टी. यांच्याशी आवश्यक करारनामा करुन पूर्ण ठेव तत्वावर कामे करण्यासाठी निधी प्राप्त करुन घ्यावा.

५. लाभार्थी ग्राहकांसोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यानुसार भांडवली अंशदानापोटी पहिला हप्ता प्राप्त झाल्यावर निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

६. योजनेची सर्व कामे शक्यतो ३० महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावीत.

७. सद्य:स्थितीत ज्याप्रमाणे मजीप्रामार्फत ज्या योजनेची देखभाल दुरुस्ती करण्यात येते त्याचप्रमाणे प्रस्तावित योजनेची देखभाल दुरुस्तीही मजीप्रामार्फत करण्यात येईल. योजनेची मालकी मजीप्राची राहील.

वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१** : ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक / कुटूंब निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्ती वेतनात दि.१ एप्रिल २०१४ पासुन १० टक्के वाढ अनुज्ञेय ठरविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पात्र अधिकारी / कर्मचा-यांना लागू करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यावर चर्चा होवून निवृत्ती वेतन धारक/कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांची संख्या व त्यावर होणा-या खर्चावर साधक बाधक चर्चा होऊन शासन निर्णय दि. ९.६.२०१४ नुसार १० टक्के निवृत्ती वेतन वाढ दि.१.११.२०१५ पासून लागू करण्यास मंजूरी देण्यांत येवून खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेनिवे/२०१४/प्र.क्र.२६/सेवा-४ दि.९.६.२०१४ अन्वये ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक/ कुटूंब निवृत्ती वेतनधारकांना सुधारित निवृत्ती वेतनावर दि.१.४.२०१४ पासून १० टक्के वाढ अनुज्ञेय ठरविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर म.जी.प्रा. मधील ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक / कुटूंब निवृत्ती वेतनधारकांना सुधारित निवृत्ती वेतनावर दि.१.११.२०१५ पासून १० टक्के वाढ लागू करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. याबाबतची पुढील कार्यवाही शासन मान्यतेने करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२** : उस्मानाबाद येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संपादित जागेवर विभागीय कार्यालयासाठी इमारत बांधण्याच्या झालेल्या वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता मिळण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

१. उस्मानाबाद शहरालगत रुईभर जलशुध्दीकरण केंद्राजवळ राष्ट्रीय महामार्गाच्या पश्चिम बाजूस मजीप्राच्या मालकीची २.५ हेक्टर इतकी जमीन उपलब्ध होती. सदर जमिनीचा वापर होत नसल्याने ती जमीन इतर शासकीय कामाकरिता वापरण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाच्या विचाराधीन होता.

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, उस्मानाबाद हे कार्यालय मार्च, १९८४ ते मार्च, २००७ पर्यंत खाजगी मालकीच्या जागेत कार्यरत होते. सदर जागेच्या भाड्यापोटी रु.१७,०००/- दरमहा इतके भाडे अदा करावे लागत होते.

३. वरील बाबी लक्षात घेऊन, मजीप्राचे कार्यालय स्वत:च्या जागेमध्ये इमारत बांधून तेथे स्थलांतरित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. सुरुवातीस कार्यालयासाठी पत्र्याची शेड बांधण्याचे प्रस्तावित होते. त्यानुसार इमारतीच्या रु. १५.१४ लक्ष इतक्या किंमतीची कार्यक्रम बाब दि. २८.३.२००६ च्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आली होती. तथापि, मा.अध्यक्ष, संचालक मंडळ तथा मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी पत्र्याच्या शेडऐवजी आर.सी.सी.बांधकाम करण्यात यावे, तसेच खर्च रु.१५.१४ लक्ष पर्यंत मर्यादित ठेवावा, असे सुचविले.

४. प्रत्यक्ष कामे करताना पत्र्याच्या शेडऐवजी आर.सी.सी. इमारत बांधण्यात आल्याने वाढीव खर्च करावा लागला. पूर्वी मंजूर अंदाजपत्रकामध्ये व निविदेमध्ये आर.सी.सी.बांधकामाच्या अनुषंगाने काही अत्यावश्यक बाबींचा समावेश नसल्याने काही जादा बाबींचे काम करणे आवश्यक होते. त्या करिता नवीन अंदाजपत्रकास मंजुरी देऊन वेगळ्या निविदेद्धारे कामे पूर्ण करण्यात आली.

५. पूर्ण केलेल्या कामापोटी अंतिमत: एकूण रु.३८.६२ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मुख्यत्वे पत्र्याच्या शेडऐवजी आर.सी.सी. बांधकाम असा बदल करावा लागल्याने, इमारतीच्या बांधकामावर झालेला वाढीव खर्च करावा लागला आहे. तथापि, मजीप्राची स्वत:ची मालमत्ता तयार झाली असून, मासिक भाड्यामध्ये बचत झाली आहे. या बाबी लक्षात घेता, प्रस्तुत कार्यक्रम बाबीस मान्यता देण्याची विनंती संचालक मंडळास करण्यात आली. सदर बाबीवर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

उस्मानाबाद विभागाचे कार्यालय हे भाड्याच्या इमारतीत कार्यरत होते. इमारत मालकास दरमहा रु. १७,०००/- इतकी रक्कम भाड्यापोटी द्यावी लागत होती. मार्च, २००८ मध्ये मजीप्राच्या कार्यालयाचे स्थानांतरण स्वत:च्या मालकीच्या इमारतीत केल्याने गेल्या ७ वर्षांचे भाडेपोटी रु. १४,२८,०००/- एवढी बचत झाली आहे व मजीप्राची मालकीची एक वास्तु सुध्दा निर्माण झाली आहे. मजीप्राच्या स्वत:च्या जागेत कार्यालय उभारण्यासाठी मा.संचालक मंडळाच्या १०३ व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र. ७ नुसार इमारतीचे बांधकाम करण्यासाठी रु. १५.१४ लक्ष इतकी रक्कम मंजूर करण्यात आली होती. वाढीव परिमाणांमुळे बांधकामावर रु.३८.६२ लक्ष इतका खर्च झालेला आहे. कार्यालयीन बांधकामाच्या या सुधारित रकमेस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत असून, पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळची चर्चा** - १ : कोल्हापूर येथे नवीन प्रादेशिक न्यायसहायक प्रयोगशाळेसाठी तसेच पुणे येथे आयुक्त, आयकर विभाग कार्यालयासाठी मजीप्राच्या इमारतीमधील जागा भाडे तत्वावर केलेल्या मागणीबाबत.

सदर आयत्या वेळच्या चर्चेच्या विषयाबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सध्या मजीप्राच्या ताब्यात असलेल्या कोल्हापूर तसेच पुणे येथील अतिरिक्त जागा अनुक्रमे प्रादेशिक न्यायसहायक प्रयोगशाळा व आयकर विभाग कार्यालयासाठी भाड्याने देण्याचे प्रस्तावित असल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन, शासकीय नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना मा.संचालक मंडळाने दिल्या.

**आयत्या वेळची चर्चा** - २ : प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांचा संचालक मंडळाचे सदस्य म्हणून समावेश करण्याची आवश्यकता नसल्याबाबत

मा. संचालक मंडळाच्या बैठकीस मा.श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव (१) सार्वजनिक आरोग्य विभाग या प्राधिकरणाचे सदस्य या नात्याने उपस्थित होत्या. नागरी अथवा ग्रामीण पाणी पुरवठा योजनांशी आरोग्य विभागाचा विशेष संबंध येत नसल्याने प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांचा संचालक मंडळाचे सदस्य म्हणून समावेश करण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणले. आवश्यकता भासल्यास निमंत्रित म्हणून प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना बैठकीस आमंत्रित करता येईल, असे प्रतिपादन त्यांनी केले. याबाबत संचालक मंडळामध्ये चर्चा होऊन मजीप्राने कायद्यात दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना संचालक मंडळाने दिल्या.

मा. मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.